गीत ः कोकण अल्बम ः माझी गाणी वैशाली सामंत

गायिका ः  वैशाली सामंत गीत ः चंद्रशेखर सानेकर संगीत ः अवधूत गुप्ते

रूप माझे जसे झलक कोकणची गं

मन समींदर तनु नदी वळणाची गं

गर्द झाडीतली दाट छाया सजणा

आमराई परी माझी काया सजणा

कोकणची चेडवा हो नाखवा

हो हिच्या घोवाला कोकण दाखवा

हो अशी कोकणची चेडवा हो नाखवा

हैया हो

लाल माझे हे गाल लाल माती परी

माझे डोळे जणू खोल हिरवी दरी

ओठ माझे गुलावी रतांबे सजणा

चाल पाहुन माझी व्हाळ थांबे सजणा

कोकणची चेडवा हो नाखवा

हो हिच्या घोवाला कोकण दाखवा

हैया हो

काय सांगू तुला काय वाटे मला

झावळयांसारख्या माझ्या खाणाखुणा

पाखरांची जशी मी भरारी सजणा

एक होडी तुझ्या मी किनारी सजणा

कोकणची चेडवा हो नाखवा

हो हिच्या घोवाला कोकण दाखवा

हैया हो